माहितीपत्रक - नंदुरबार जिल्हा होमगार्ड नोंदणी - २०२४

## - होमगार्ड संघटना -

उददेश :- देशातील जास्तीत जास्त नागरीकांना सैनिकी, तसेच आपातकालीन,कायदा व सुव्यवस्था सुरळीत राखण्याचे प्रशिक्षण देवून जबाबदार व शिस्तप्रिय नागरीक घडविणे हा होमगार्ड संघटनेचा उददेश आहे.

**होमगार्ड सदस्य नोंदणीकरीता उमेदवारांसाठी मार्गदर्शन सूचना**

१. **होमगार्ड सदस्यत्व** - महाराष्ट्रातील होमगार्ड संघटना ही शासन संचलित पुर्णतःमानसेवी तत्वावर आधारीत आहे. या संघटनेचे सदस्य होणे म्हणजे कोणत्याही प्रकारची नोकरी अथवा रोजगार नाही. हे सदस्यत्व तीन वर्षाकरीता दिले जात असून आपण संघटनेसाठी दिलेल्या सेवेच्या गुणवत्तेवर पुढे ३-३ वर्षाच्या टप्याने वयाच्या ५८ वर्षा पर्यंत पुर्ण नोंदणीकृत करता येते.

२. **होमगार्ड सदस्यांचे कर्तव्य** - होमगार्ड सदस्यांना दररोज कर्तव्य दिले जात नाही. पोलीस दलाच्या मागणी प्रमाणे कायदा व सुव्यवस्था राखणे कामी पोलीस दलासोबत बंदोबस्त कर्तव्य आपातकालीन परिस्थिती मध्ये अग्निशमन,विमोचन,पुरविमोचन तसेच रोगराई,महामारी काळात,संपकाळ प्रशासनात मदत कार्य असे कर्तव्य दिली जातात.

३. **होमगार्डना देय भत्ता** - होमगार्ड सदस्याना बंदोबस्त काळात प्रति दिन ५७०/- कर्तव्य भत्ता व १००/- उपहार भत्ता दिला जातो. तसेच प्रशिक्षण काळात रु. ३५/- खिसा भत्ता व १००/- भोजन भत्ता व साप्ताहिक कवायतीसाठी रु.९०/- कवायत भत्ता दिला जातो.

४. **शास्ती** - होमगार्ड सदस्यांना दररोज कर्तव्य दिले जात नाही. परंतु अत्यआवश्यक प्रसंगी बंदोबस्त कर्तव्याकरीता विनाकारण अनुपस्थित राहणा-या/कर्तव्या मध्ये कसुर करणारे/आदेशचे पालन न करणा-या होमगार्ड सदस्यांना मुंबई होमगार्ड अधिनियम १९४७ कलम ७ (१) अन्वये बडतर्फ किंवा २५०/- इतका दंड/तीन महिन्याची साधी कैद अशी शिक्षा करण्याची तरतुद आहे.

५. **होमगार्ड नोंदणी** - होमगार्ड नोंदणी करीता कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारले जात नाही.सदस्यत्व मिळणेकरीता कोणत्याही इतर मार्गाचा ( वशिला किंवा लाच ) अवलंब करुन नये, या करीता कोणी ही लाच/पैशाची मागणी केल्यास अधिक्षक,लाचलुचपत प्रतिबंध कार्यालय,नंदुरबार किंवा मा.जिल्हा समादेशक, होमागर्ड तथा अपर पोलीस अधिक्षक,नंदुरबार यांच्याशी संपर्क साधावा.

६. **होमगार्ड सदस्यत्वाचे फायदे**

१.सैनिकी गणवेश परिधान करण्याचा मान व विना शुल्क सैनिकी प्रशिक्षण
२. तीन वर्ष सेवा पुर्ण होमगार्डना राज्य पोलीस दल,वन विभाग,अग्निशमन दला मध्ये ५ टक्के आरक्षण
३. प्रथमोपचार,अग्निशमन,विमोचन या सारख्या विषयाचे प्रशिक्षण घेण्याची संधी
४. गौरवास्पद कामगिरी केल्यास विविध पुरस्कार/ पदके मिळविण्याची संधी
५. स्वताचा व्यवसाय/ शेती इ.सांभाळत देश सेवा करण्याची संधी

## होमगार्ड नोंदणी,नियम व अटी

१. **होमगार्ड पात्रतेचे निकष**

अ) शैक्षणिक पात्रता - कमीत कमी १० वी उत्तीर्ण

( यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ नाशिक व राष्ट्रीय मुक्त विद्यालय शिक्षण संस्था,दिल्ली यांची प्रमाणपत्रे समकक्ष म्हणुन विचारात घेतली जातील.)

ब) शारिरीक पात्रता

१) वय २० वर्ष पुर्ण ते ५० वर्षाचे आत **( दिनांक - १४/०८/२०२४ रोजी )**
२) उंची पुरुषांकरीता - १६२ से.मी. महिलांकरीता - १५० से.मी.
३) छाती ( फक्त पुरुष उमेदवारांकरीता)
( न फुगविता किमान ७६ से.मी. कमीत कमी ५ से.मी.फुगविणे आवश्यक )

क) आवश्यक कागदपत्र

१) रहिवासी पुरावा - आधार कार्ड, मतदान ओळखपत्र
२) शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र
३) जन्म तारीख पुराव्या करीता एस.एस.सी. बोर्ड प्रमाणपत्र / शाळा सोडल्याचा दाखला
४) तांत्रिक अर्हता धारण करीत असल्यास तत्सम प्रमाणपत्र
५) खाजगी नोकरी करीत असल्यास मालकाचे ना हरकत प्रमाणपत्र
६) तीन महिन्याच्या आतील पोलीस चारित्र पडताळणी प्रमाणपत्र

२. **शारिरीक क्षमता चाचणी**

**अ) धावणे**

| पुरुष उमेदवार | गुण | महिला उमेदवार | गुण |
|---|---|---|---|
| **१६०० मीटर** | | **८०० मीटर** | |
| ५ मिनिटे १० सेकंद व त्यापेक्षा कमी | २० | २ मिनिटे ५० सेकंद व त्यापेक्षाकमी | २५ |
| ५ मिनिटे १० सेकंदापेक्षा जास्त परंतु ५ मिनिटे ३० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी | १८ | २ मिनिटे ५० सेकंदापेक्षा जास्त परंतु ३ मिनिटे ०० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी | २२ |
| ५ मिनिटे ३० सेकंदापेक्षा जास्त परंतु ५ मिनिटे ५० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी | १६ | ३ मिनिटे ०० सेकंदापेक्षा जास्त परंतु ३ मिनिटे १० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी | १८ |
| ५ मिनिटे ५० सेकंदापेक्षा जास्त परंतु ६ मिनिटे १० सेकंद किंवा त्यापेक्षा जास्त | १४ | ३ मिनिटे १० सेकंदापेक्षा जास्त परंतु ३ मिनिटे २० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी | १४ |
| ६ मिनिटे १० सेकंदापेक्षा जास्त परंतु ६ मिनिटे ३० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी | १२ | ३ मिनिटे २० सेकंदापेक्षा जास्त परंतु ३ मिनिटे ३० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी | १० |
| ६ मिनिटे ३० सेकंदापेक्षा जास्त परंतु ६ मिनिटे ५० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी | १० | ३ मिनिटे ३० सेकंदापेक्षा जास्त परंतु ३ मिनिटे ४० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी | ०६ |
| ६ मिनिटे ५० सेकंदापेक्षा जास्त परंतु ७ मिनिटे १० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी | ०६ | ३ मिनिटे ४० सेकंदापेक्षा जास्त परंतु ३ मिनिटे ५० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी | ०४ |
| ७ मिनिटे १० सेकंदापेक्षा जास्त परंतु ७ मिनिटे ३० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी | ०२ | ३ मिनिटे ५० सेकंदापेक्षा जास्त परंतु ४ मिनिटे किंवा त्यापेक्षाकमी | ०२ |
| ७ मिनिटे ३० सेकंदापेक्षा जास्त | ०० | ४ मिनिटे ०० सेकंदापेक्षा जास्त | ०० |

**ब) गोळाफेक - पुरुष उमेदवारांकरीता ७.२६० किलो ग्रॅम वजनाचा गोळा फेकावा लागेल**

| गोळाफेकीचे अंतर(मीटरमध्ये) | गुण |
|---|---|
| ८.५० मीटर किंवा जास्त | १० |
| ७.९० मीटर किंवा जास्त परंतु ८.५० मीटरपेक्षा कमी | ०९ |
| ७.३० मीटर किंवा जास्त परंतु ७.९० मीटरपेक्षा कमी | ०८ |
| ६.७० मीटर किंवा जास्त परंतु ७.३० मीटरपेक्षा कमी | ०७ |
| ६.१० मीटर किंवा जास्त परंतु ६.७० मीटरपेक्षा कमी | ०६ |
| ५.५० मीटर किंवा जास्त परंतु ६.१० मीटरपेक्षा कमी | ०५ |
| ४.९० मीटर किंवा जास्त परंतु ५.५० मीटरपेक्षा कमी | ०४ |
| ४.३० मीटर किंवा जास्त परंतु ४.९० मीटरपेक्षा कमी | ०३ |
| ३.७० मीटर किंवा जास्त परंतु ४.३० मीटरपेक्षा कमी | ०२ |
| ३.१० मीटर किंवा जास्त परंतु ३.७० मीटरपेक्षा कमी | ०१ |
| ३.१० मीटरपेक्षाकमी | ०० |

**सुचना-**

१. उमेदवाराला जास्तीत जास्त तीन वेळा संधी दिल्या जातील व त्यातील अधिकतम अंतर ग्राहय धरले जाईल

२.गोळाफेकीत फेकलेला गोळा जर सीमांकन रेषेच्या मध्यावर पडला तर उमेदवारास नजीकच्या वरच्या श्रेणीतीलगुण दिले जातील.( उदा.जर गोळाफेकीचे अंतर ६.१० मीटर असेल तर उमेदवारला ६ गुण देण्यात यावे )

**क) गोळाफेक - महिला उमेदवारांकरीता ४ किलो ग्रॅम वजनाचा गोळा फेकावा लागेल**

| गोळाफेकीचे अंतर(मीटरमध्ये) | गुण |
|---|---|
| ६.०० मीटर किंवा त्यापेक्षा जास्त | १० |
| ५.५० मीटर किंवा जास्त परंतु ६.०० मीटरपेक्षा कमी | ०८ |
| ५.०० मीटर किंवा जास्त परंतु ५.५० मीटरपेक्षा कमी | ०६ |
| ४.५० मीटर किंवा जास्त परंतु ५.०० मीटरपेक्षा कमी | ०४ |
| ४.०० मीटर किंवा जास्त परंतु ४.५० मीटरपेक्षा कमी | ०२ |
| ४.०० मीटरपेक्षा कमी | ०० |

**सुचना-**

१. उमेदवाराला जास्तीत जास्त तीन वेळा संधी दिल्या जातील व त्यातील अधिकतम अंतर ग्राहय धरले जाईल

२.गोळाफेकीत फेकलेला गोळा जर सीमांकन रेषेच्या मध्यावर पडला तर उमेदवारास नजीकच्या वरच्या श्रेणीतील गुण दिले जातील. ( उदा.जर गोळाफेकीचे अंतर ५ मीटर असेल तर उमेदवारला ६ गुण देण्यात यावे )

**ड. तांत्रिक अर्हता गुण**

| तांत्रिक अर्हता एकूण गुण - १० | अटींची पुर्तता केल्यास | गुण |
|---|---|---|
| १. आय टी आय प्रमाणपत्र ( ६ महिन्याचा डिप्लोमा )<br>२. खेळाडू मध्ये प्राविण्य मिळविलेल्या व्यक्ती ( जिल्हास्तरीय क्रिडा स्पर्धामध्ये किमान प्रथम/ व्दितीय व तृतीय श्रेणी व राज्यस्तरीय खेळाडू असल्यास तो प्राविण्य प्राप्त )<br>३. माजी सैनिक<br>४. एन.सी.सी. बी प्रमाणपत्र<br>५. एन.सी.सी. सी प्रमाणपत्र<br>६. नागरी संरक्षण सेवेत असलेले परंतु स्थानिक ठिकाणी तीन प्रशिक्षण पूर्ण केलेले प्रमाणपत्र धारक<br>७. जड वाहन चालक परवानाधारक उमदेवार | या पैकी १ अट पूर्ण करीत असेल तर<br>या पैकी २ अट पूर्ण करीत असेल तर<br>या पैकी ३ अट पूर्ण करीत असेल तर<br>या पैकी ४ अट पूर्ण करीत असेल तर<br>या पैकी ५अट पूर्ण करीत असेल तर<br>या पैकी ६ अट पूर्ण करीत असेल तर<br>वरील सर्व अटी पुर्ण करीत असतील तर | २ गुण<br>३ गुण<br>४ गुण<br>५ गुण<br>७ गुण<br>८ गुण<br>१० गुण |

नोंदणी अर्ज भरणे संदर्भातील सुचना

नंदुरबार जिल्हा होमगार्ड नोंदणी - २०२४

१. होमगार्ड नोंदणीचे अर्ज दिनांक - **२६/०७/२०२४ ते १४/०८/२०२४** या कालावधीमध्ये https://maharashtracdhg.gov.in/mahahg/enrollmentform php या संकेतस्थळावर फक्त इंग्रजी या भाषेमधुन भरावयाच्या असुन अर्ज भरताना सर्व माहिती काळजीपुर्वक भरावयाची आहे. उदा.आधारकार्ड क्रमांक,जन्मतारीख व्यवस्थित नोंद कराव्यात. एका उमेदवाराला आधारकार्ड क्रमांकाच्या सहाय्याने एकदाच अर्ज दाखल करता येईल.

२. उमेदवार ज्या भागातील रहीवासी आहे. तो भाग ज्या पोलीस ठाणेच्या अंतर्गत येतो त्यांना त्याच पोलीस टाणे अंतर्गत पोलीस ठाणे आणि पथकामध्ये त्याच जिल्हयात अर्ज दाखल करता येईल. इतर जिल्हयातील अर्ज बाद ठरतील.

३. अर्ज SUBMIT केल्यावर Print Registration Form या मेनू मध्ये जावुन त्याची छायांकित प्रत काढावयाची आहे. त्यावर उमेदवारांनी भरलेला सर्व मजकूर छापुन येईल. त्यावर आपला वर्तमानातील एक फोटो चिकटवावा. मराठी मधील नाव उमदेवारांनी स्वत: पेनानी लिहावयाचे आहे. इतर कोणतीही माहिती उमेदवारांनी भरु नये.

४. **ऑन लाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत दिनांक -१४/०८/२०२४ सायं.५ वाजेपर्यंत राहील. सर्व अर्जाची छाननी झालेनंतर कागदपत्र पडताळणी व शारिरीक क्षमता मैदानी चाचणीचे दिनांक नंतर जाहीर करण्यात येईल.**

५. कागदपत्र पडताळणी व शारिरीक क्षमता चाचणी करीता येताना अ.क्र. १ मध्ये दर्शविल्याप्रमाणे सर्व आवश्यक कागदपत्रांच्या उमेदवारांनी स्वत:स्वाक्षरी केलेल्या छायांकित प्रति अर्जासोबत जोडाव्यात.अर्ज नोंदणीच्या दिवशी स्वत:घेवून यावे. दोन फोटो व मुळ कागदपत्र नोंदणीच्या वेळी पडताळणी करीता बंधनकारक राहील.

६. उमेदवारांना नोदंणीकरीता स्व:खर्चाने उपस्थित रहावे लागेल,नोंदणी दरम्यान किंवा प्रवासा दरम्यान कोणतीही दुखापत झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी उमेदवाराची राहील.

७. पात्र उमेदवारांची अंतिम निवड पथकनिहाय रिक्त असलेल्या जागानुसार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.समान गुण प्राप्त करणा-या उमेदवाराच्या बाबतीत वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवारास प्राधान्य दिले जाईल. तसेच वय समान असेल तर शैक्षणिक अर्हता व तांत्रिक प्रमाणपत्रांच्या आधारावर निवड निश्चित करणेत येईल.

८. यापुर्वी होमगार्ड संघटनेतुन अकार्यक्षम/बेशिस्त ठरल्याने न्यायालयीन प्रकरणी दोषी असल्याने सेवासमाप्त केलेले होमगार्ड नोंदणीस अर्ज करणेस अपात्र ठरतील. मात्र स्वेच्छेने राजीनामा दिलेले होमगार्ड विहीत अटी पुर्ण करीत असतील तर अर्ज करणेस पात्र राहतील.

९. अंतिम गुणवत्ता यादी याच संकेतस्थळावर प्रसिध्द केली जाईल.

१०. पथकनिहाय रिक्त जागा ( संख्या ) कमी जास्त करण्याचे तसेच तांत्रिक कारणास्तव होमगार्ड सदस्य नोंदणी रदद करणे व पुढील तारीख देण्याचे अधिकार मा.अध्यक्ष तथा जिल्हा समादेशक,होमगार्ड यांनी राखुन ठेवले आहे.

११. अर्ज भरणे संदर्भात काही अडचण असल्यास जिल्हा होमगार्ड कार्यालय,नंदुरबार येथे ०२५६४/२१००६५ या क्रमांकावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

**ऑनलाईन अर्ज खालील प्रमाणे भरावा**

होमगार्ड विभागाच्या https://maharashtracdhg.gov.in/mahahg/login१.php या संकेत स्थळावर जावुन HGs ENROLLMENT या मेनू मधुन ONLINE ENROLLMENT FORM हा सबमेनू निवडावा

१. सर्व प्रथम जिल्हा Select करावा ( ज्या जिल्हयात नोंदणी जाहीर झाली असेल तेच जिल्हे मेनू मध्ये उपलब्ध असतील)

२. त्यानंतर आपण ज्या पोलीस ठाणेच्या हददी मध्ये राहता त्या विभाग ज्या होमगार्ड पथकामध्ये येतो ते पथक आणि पोलीस ठाणे Select करावे. या करीता खालील तक्ता पहावा.

| अ.क्र. | होमगार्ड पथक | अंतर्गत पोलीस ठाणे | अनुशेष | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | पुरुष | महिला | एकूण |
| ०१ | नंदुरबार | नंदुरबार शहर पो.स्टे.,नंदुरबार तालुका,पो.स्टे.,नंदुरबार उपनगर पो.स्टे. | १४ | ९ | २३ |
| ०२ | शहादा | शहादा पो.स्टे.,सारंगखेडा पो.स्टे.,म्हसावद पो.स्टे. | १५ | १ | १६ |
| ०३ | अक्कलकुंवा | अक्कलकुंवा पो.स्टे., मोलगी पो.स्टे. | १६ | ४ | २० |
| ०४ | तळोदा | तळोदा पो.स्टे.,धडगांव पो.स्टे. | ९ | २ | ११ |
| ०५ | नवापुर | नवापुर पो.स्टे.,विसरवाडी पो.स्टे. | ९ | ० | ९ |
| | | | | | |
| | | एकूण | ६३ | १६ | ७९ |

३. आपला १२ अंक आधार क्र. काळजीपुर्वक भरावा. चुकीचा भरल्यास अर्ज बाद ठरविला जाईल.

४. यानंतर लिंक, पुर्ण पत्ता, शिक्षण, व्यवसाय, इमेल आयडी ही माहिती काळजीपुर्वक भरावा.

५. वरील जाहीरातीमध्ये दिल्याप्रमाणे ज्या प्रकारची तांत्रिक अर्हता आहेत त्यांची संख्या Select करावी.

६. उदा.उमेदवार जड वाहन परवानाधारक,प्राविण्यप्राप्त खेळाडू आणि NCC - B प्रमाणपत्र धारक असेल तर तांत्रिक अर्हता तीन (Three) राहील

७. जन्मतारीख,उंची ( से.मी.मध्ये ) काळजी पुर्वक भरावी.

८. यापुर्वी होमगार्ड सेवेत असाल तर YES असे निवडावे. असाल तर ज्या कारणास्तव कमी करणेत आले त्या आदेशाची प्रत सोबत जोडावी.

९. अर्ज SUBMIT केल्यावर आपण सरळ PRINT करण्यासाठीच्या page वर जात त्या ठिकाणी आपला आधार क्रमांक आणि जन्मतारीख भरुन आपल्या अर्जाची पहाणी करुन अर्जाची PRINT A4 पेपरवर काढावी व नोंदणी करीता येताना आवश्यक कागदपत्रांसह सादर करावी.

**कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत सर्व्हर कनेक्टीव्हीटी मिळत नसल्यास कार्यालयीन वेळ वगळुन अर्ज भरावा.**

(निलेश तांबे)भा.पो.से.
जिल्हा समादेशक होमगार्ड तथा
अपर पोलीस अधिक्षक नंदुरबार.